MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



कडा:- आष्टी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते दुचाकी रॅलीने आ.भीमराव धोंडे यांच्या प्रचार सभेला आले होते. या सभेत कडा येथील सुधीर ढोबळे,परमेश्वर खेडकर, सतिष भैय्या आंधळे,विष्णू गोल्हार सह अनेक कार्यकर्त्यांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या गटात प्रवेश केला.


बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -५१ | गुरूवार दि.०७ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -51 | THURSDAY DT.07 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# हातात काठी यायची वेळ झाली तरी खुर्चीचा मोह सुटेना!

## आ. प्रकाशदादांना झटका, भावांचा पुतण्याचा झाला नाही तो जनतेचा कधी होणार अशोक डकाचा रमेश आडसकराना पाठिंबा

### मराठा आरक्षण आंदोलकावर खोटे गुन्हे दाखल केले आ. प्रकाश सोळंकेने दलित मुस्लिमांचा आयुष्यभर द्वेष केल्यामुळं पराभव अटळ?







### अशोक डकाच्या पाठिंबामुळं रमेश आडसकर यांचं पारडे जड?

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये महत्त्वाची विधानसभा म्हणून २०२४ ला आता माजलगाव कडे पाहिले जात आहे शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून रमेश आडसकर यांना उमेदवारी मिळेल असं वाटले परंतु त्या ठिकाणी शरद पवारांनी रमेश आडसकरांना दगा देत त्या ठिकाणी मोहन जगताप यांना उमेदवारी दिली प्रकाश शेळके यांना अजित पवारांचे राष्ट्रवादी कडून उमेदवारी मिळाली परंतु प्रकाश सोळुंखे पुतण्याच्या वादामध्ये प्रकाश सोळंकेचे आता तीन नंबरला राहण्याचे स्थान मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे प्रकाश सोळंके यांना आता धक्का बसल्यानंतर त्या ठिकाणी प्रकाश सोळंकेना हरवण्यासाठी आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी जिल्हा अध्यक्ष तथा मुंबई बाजार समितीचे अध्यक्ष अशोक आबाटक यांनी आता अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांना पाठिंबा दिल्यामुळे त्या ठिकाणी त्यांचे पारडे जड झाले आहे. त्यामुळे प्रकाश सोळुंके यांचा आता पराभव अटळ मानला जात आहे रमेश आडसकर यांचा माजलगाव मतदारसंघांमध्ये मोठा जनसंपर्क असल्यामुळे त्यांच्या निर्णयाने प्रकाश म्हणून त्यांना धक्का बसला आहे.

माजलगाव ।प्रतिनिधी

प्रकाश दादा तुम्ही करा आता रामनामाचा जप आडसकरांच्या मदतीला धावून आले ल अशोक डक आ. प्रकाश सोळंके यांचे दिवसमान सध्यातरी खराब असल्याचे दिसून येत असून राष्ट्रवादीचे नेते अशोक आबा डक यांनी देखील रमेश आडसकर यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेऊन प्रकाश दादांना हाबाडा देऊन मुळासकट खुटा उपटण्यासाठी कामाला लागणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे राजकीय निवृत्ती घेतली असती तर असले दिवस पहायला मिळाले नसते आता निवृत्ती घेऊन रामनामाचा जप करण्याची वेळ आली असल्याचे मतदारातून बोलले जात आहे.

- आ.प्रकाश सोळंकेना या अगोदर विजयी करण्यामध्ये अशोक डकाचा सिंहाचा वाटा.
- जो आ.प्रकाश सोळंके स्वतःच्या भावाचा, पुतण्याचा झाला नाही तो मतदारसंघातील जनतेचा कधी होणार?
- आ. प्रकाश सोळंके यांनी जात बघून कार्यकर्त्यांना गुत्तेदारीमध्ये टक्केवारीत ऍडजेस्ट केले अनेक कार्यकर्ते आ. प्रकाशदादा पाडण्यासाठी सज्ज ?
- माजलगाव मतदार संघातील मुस्लिम,दलित ठरवणार माजलगावचा
- आमदार कोण त्यामुळे आ.प्रकाश सोळकेच्या पायाखालची वाळू सरकू लागली?
- निधीचा भेदभाव करत गुत्तेदार पोसण्याचं काम गाव पातळीवर करणाऱ्या आ.प्रकाश सोळंकेला माजलगावची जनता धडा शिकवणार?

- आ. प्रकाश सोळुंके म्हणजे सत्तेच्या खुर्चीला चिटकून बसलेला नेता?
- आ.प्रकाश सोळुंखे यांनी टक्केवारीवर गुत्तेदार पोचले मतदारसंघ भकास केला?
- आ. प्रकाश सोळंकेने गेल्या ३५ वर्षाचा हिसाब द्यावा माजलगाव मतदारसंघांमध्ये किती निधी आला व त्या निधीचा काय केलं व कुठे खर्च केला हे दाखवावे?
- आमदार प्रकाश सोळंके यांनी ओबीसी मराठा वादामध्ये तेल ओतण्याचे काम केलं?
- आ. प्रकाश सोळंकेने पुतण्याचं नाव घोषित करून पुन्हा आमदारकी लढविण्यासाठी स्वतःच्या गुडघ्यालाच बाशिंग बांधले.?
- अशोक डक यांची रमेश आडसकरांना साथ निर्णय, आडसकरांची ताकद वाढणार.
- प्रकाश सोळंके ना अशोक डक यांच्यामुळे मोठा झटका.?

राजकारण म्हटले की कोण कुठे कधी जाईल आणि शब्द कधी बदल करतील याचा नेम राजकारनात नसतो राष्ट्रवादी चे नेते अशोक आबा डक हे देखील प्रकाश दादांना हाबाडा देण्यासाठी अडसकरांच्या गोठात सामील होणार असल्याने राजकीय दृष्ट्या प्रकाश सोळंके याना अडचणीत सर्वच बाजूने भर पडू लागली असून अडसकरांच्या बाजूने आता ताकद वाढत असल्याचे दिसून येत आहे.

## कुंडलिक खांडेची लोकप्रियता वाढली मनोज जरांगे पाटलाचा अपक्षाना पाठिंबा नाहिच

बीड ।प्रतिनिधी

बीड मतदारसंघामध्ये २०१९ च्या तुलनेत या निवडणूकीत पाच उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये महायुतीकडून डॉ. योगेश क्षीरसागर, महाविकास आघाडीकडून संदीप क्षीरसागर, तिसऱ्या आघाडीकडून कुंडलिक खांडे, अपक्ष ज्योतीताई मेटे, अनिल जगताप हे पाच प्रमुख चेहरे या निवडणूकीच्या मैदानात उतरले आहेत. काल बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले मनोज जरांगे पाटील यांनी माझा अपक्षांना पाठिंबा नसणार असल्याचे वक्तव्य केले होते. या बक्तव्यामुळे तिसऱ्या आघाडीचे उमेदवार कुंडलिक खांडे यांचा आत्मविश्वास वाढल्याचे दिसत आहे. तसेच कुंडलिक खांडेंची प्रचारयंत्रणा मतदारसंघात काम करताना दिसत आहे.



बीड मतदारसंघामध्ये यावेळेस अटीतटीचा सामना दिसणार आहे. विशेष म्हणजे मनोज जरांगे यांनी अपक्ष उमेदवार देणार असल्याची घोषणा केली होती मात्र ऐनवेळी त्यांनी निवडणूकीतून माघार घेतली. यानंतर ते काल बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी मी कोणत्याही अपक्ष उमेदवाराला पाठिंबा देणार नसल्याचे मत व्यक्त केले. या वक्तव्यामुळे तिसऱ्या आघाडीचे कुंडलिक खांडे यांचा आत्मविश्वास मात्र वाढताना दिसत आहे. कुंडलिक खांडेंना विश्वास आहे की मनोज जरांगे पाटील त्यांनाच पठिंबा देतील यामुळे कुंडलिक खांडे यांनी मतदारसंघात यंत्रणा टाईट केली आहे.

### कुंडलिक खांडेंकडे बुथनिहाय नियोजन

बीड मतदारसंघामध्ये ज्या उमेदवाराला विजयाचा गुलाल लावायचा असेल त्या उमेदवाराला बीड मतदारसंघात मायक्रो नियोजन करत या निवडणूकीचा सामना करावा लागणार आहे. याच अनुषंगाने तिसऱ्या आघाडीचे अधिकृत उमेदवार कुंडलिक खांडे यांनी बीड मतदारसंघातील सर्व बुथनिहाय नियोजन आखली आहे. यासह त्यांच्या प्रचार दौऱ्यास वाढता पाठिंबा मिळत आहे.

## सौ.गिताभाभी बाळराजे पवार यांचा शहरात डोअर टू डोअर झंझावाती प्रचार ; गेवराईत आ. पवारांचा ऑटोरिक्षा सुसाट

गेवराई ।प्रतिनिधी

गेल्या तीन दशकापासून शहरातील माय बाप जनतेने आमच्या कुटुंबावर विश्वास टाकलेला आहे. हे उपकार आमचे कुटुंब कधीच विसरणार नाही. गेवराई शहर आमचे घर असून येथील जनता ही आमची मायबाप असल्याचे समजून सेवा करत आहोत. असे प्रतिपादन सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी शहरातील प्रचार दौऱ्या प्रसंगी बोलताना केले. त्यांच्या या झंझावाती प्रचार दौऱ्याने आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट असल्याचे दिसत आहे.गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारार्थ त्यांनी शहरातील डोअर टू डोअर जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, बाळराजे दादा पवार व आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून शहरात केलेल्या दर्जेदार कामा मुळेच ग्रामीण



भागातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना विधानसभेला उभे रहावे असा आग्रह केला होता. त्याच मागणीनुसार गेवराई विधानसभा निवडणूक २०१४ ला गेवराई मतदारसंघातील जनतेने ६० हजार मताच्या फरकाने त्यांना निवडून दिले, यांची जाणीव ठेवुन आ.लक्ष्मण आण्णांनी प्रमाणिक प्रयत्न करुन मतदारसंघातील प्रत्येक गावा गावात दर्जेदार रस्ते केले आहेत यांची मतदारसंघातील जनता साक्षीदार आसून त्यांना दुसऱ्यांदा ही या मतदार मायबाप जनतेने सेवा करण्याची संधी दिली आन त्यांनी दहा वर्षात या तालुक्याचा कायापालट केला. म्हणून येणाऱ्या २० नोव्हेंबरला १५ क्रमांकाचे ऑटोरिक्षा या चिन्हा समोरील बटन दाबून मतदार आ.लक्ष्मण आण्णा पवार यांना पुन्हा या मतदार संघाची सेवा करण्यांची संधी देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या या झंझावाती प्रचाराने गेवराई शहरासह मतदार संघात आ.लक्ष्मण पवार यांची ऑटोरिक्षा सुसाट धावत असल्याचे दिसून येत आहे. या प्रचार दौऱ्यात त्यांच्या समवेत आ.लक्ष्मण पवार यांच्या सुविद्य पत्नी भाग्यश्रीताई पवार, रत्नमालाताई मोटे, नगरसेवक राहुल खंडागळे, याहीया खॉन, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, आप्पासाहेब कानगुडे, राम पवार, संजय इंगळे, शिनुभाऊ बेद्रे, समाधान मस्के, रजीत खाजेकर, लक्ष्मण चव्हाण, महादेव बेद्रे, राणा कानाडे, पप्पु काबंळे, किशोर काडेकर, लहुराव सावंत, नितीन कांडे, किरण गायकवाड, मुरलीधर सुतार, सुदाम चव्हाण, विठ्ठल धापसे, माऊली सुतार, बाळराजे थोरात, नवनाथ धुरंधरे, अनिल धापसे, हारी पंडीत, इमरान शेख, सादेक चाचु, संतोष सुतार, भुषण जोगदंड, पिंटु साळवे, दिपक अवघड, शिवाजी काळे, शेख शब्बीर, शेख ईर्शाद, शौकत पठाण, दाऊद पठाण, योगेश मोटे, पप्पु बांडे, संकेत पौळे, प्रकाश बर्डे, पिंटु बर्डे, अमोल हाद्गुले, राजेंद्र तापडीया, शेख बाबा, आदि उपस्थित होते.

# मी विकासासाठी खेचून आणलेल्या निधीचा योग्य वापर करून घेण्यासाठी पुन्हा एकदा संधी द्या - आ.लक्ष्मण पवार

## आ.लक्ष्मण पवारांच्या प्रचार दौऱ्याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातील बदलत्या परिस्थितीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. मागील दहा वर्षाच्या काळात मतदारसंघातील प्रत्येक अडचण समजुन घेत अनेक अडचणी मार्गी लावण्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न केले आहेत. मतदारसंघातील विकास कामासाठी हाजारो कोटी रुपये खेचून आणत दर्जेदार कामे करून घेतली आहेत. अनेक ठिकाणी कामे सुरू आहेत, या सर्व निधीचाही योग्य वापर व्हावा यासाठी तालुक्यातील मायबाप जमतेने मला पुन्हा संधी द्यावी असे आवाहन आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

गेवराई विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांनी पिंपळनेर येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी गंगाधर घुमरे, सतिष पाटील, सुंदर चव्हाण, दुष्यंत डोगरे, मनोज पाटील, विठ्ठल शिदे, जितु बोबडे, राधाकिसन पेंढारे, गव्हाणे सर, भागवत पवळ, भागवत दुबाले,बंडु दुबाले, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, गेवराई मतदारसंघातील पाडळशिंगी ते लोखंडी सावरगाव, चकलांबा ते पांढरवाडी- गेवराई,



बागपिंपळगाव -तलवाडा-राजेगाव, तर नव्याने सुरू झालेला जातेगाव - गेवराई, रेवकी-देवकी, अशा अनेक मोठ्या रस्त्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न करीत हाजारो कोटी निधी खेचून आणलेला आहे. हे सगळे रस्ते दर्जेदार करुन घेण्यासाठीच तसेच भविष्यातही आणखी खूप काम करायचे आहे. येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर सिंचनाची कामे करायची आहेत. यातून तालुक्यातील शेतकरी सदन झाला पाहिजे हेच आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणून यासाठी आपण येत्या २० तारखेला १५ क्रमांकाचे ऑटोरिक्षा या चिन्हसमोरील बटन दाबून मला प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारांना केले. या मेळाव्याला पिंपळनेर परिसरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शौयब आत्तार प्रमेश्वर दुबाले,ज्ञानेश्वर शिदे,कानीफ वीर,लहु गायकवाड, आसाराम थोटे,नवनाथ डावकर,अशोक फुणे,रामप्रसाद थोटे ,चंदु मोरे,दादाशिव नागरगोजे, गोरख मुंडे, अंनता नागरगोजे,नाना गव्हाणे,रामनाथ आंदुरे,लक्ष्मण पैठणे,रुस्तुम नांदे,बाळासाहेब आवारे,दत्ता किवणे,महेश कदम,दत्ता मोरे,सतिष हाटोटे,अंगद देवकर, रमेश गाडे,समीर बेग,मनोज गुंड,अशोक घोलप,गव्हाणे सर,सलीम शेख,रसुलभाई,जमील भाई,बाबा आरे,निवृत्ती मते,प्रितम वाघमारे,माने सरपंच, सतिष शिदे,प्रकाश मते, आदीनी परिश्रम घेतले आहेत

# अंमळनेर डोंगरकिन्ही सर्कलमध्ये शैक्षणिक वातावरण तयार झाल्याने अनेक मुले नोकरी धंद्याला लागले-सुरेश धस

## आष्टी मतदारसंघात सुरेश धस यांनीच मारली मुसंडी अडचणीत धावुन येणाऱ्या नेत्याचे गावागावात जंगी स्वागत

आष्टी (सुरेश कांबळे)

अंमळनेर परिसरामध्ये शैक्षणिक वातावरण तयार झाल्यामुळे अनेक मुलं नोकरी धंद्याला लागले अनेक तरुण देश सेवेत सैनिक म्हणून गेले याचा मला सार्थ अभिमान वाटत आहे. असे प्रतिपादन सुरेश धस यांनी केले. २३१ आष्टी-पाटोदा-शिरुर का. विधानसभा मतदारसंघाचे भाजपा-शिवसेना- रि.पा.ई. (आ) आणि मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार म्हणून अंमळनेर व डोंगरकिन्ही सर्कलमधील गावभेट दौऱ्यात ते बोलत होते.सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले, मी जिल्हा परिषद चा उपाध्यक्ष असताना सर्वात अगोदर जरेवाडीच्या शाळेच्या बाबतीमध्ये गावकऱ्यांनी मागणी करत जिल्हा परिषद शाळेकडे लक्ष वेधून या शाळेकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आणून देत गोरगरीब सामान्य कुटुंबातील मुलांचे शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचं आहे आणि याबाबतीमध्ये या संपूर्ण परिसरामध्ये एक चळवळ उभा राहिली या चळवळीमध्ये प्रत्येक शिक्षकाने गावकऱ्यांनी योगदान दिले आणि त्यांना लागेल त्या सगळ्या सुख सुविधा पुरविण्यामध्ये मी कुठेही मागे पाहिले नाही. २०१४ नंतर एकही शाळा खोली किंवा शाळेला कोणाचीही व्हिजिट त्या ठिकाणी झालेली नसताना शेवटी आपण आपलं भविष्य घडवण्यासाठी भौगोलिक परिस्थिती आपल्या भागातील अत्यंत खराब आहे परंतु शिक्षण हे आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचं माध्यम हा उदात्त हेतूने शिक्षणाला पुढील अशा पद्धतीने सगळ्या सुविधा देणे हे लोकप्रतिनिधीची जबाबदारी घेऊन ती मी पूर्णपणे या ठिकाणी पार पाडली.हा डोंगराळ भाग असल्याने शेतकऱ्यांना रानडुकराचा या परिसरामध्ये खूप मोठा त्रास होता. याचा बंदोबस्त करण्याचा देखील अनेक वेळा प्रयत्न केला आणि तो यशस्वी देखील झाला.शेतकरी डुकराच्या होणारा त्रासाला वैतागलेला आहे हे दाखव त्यांच्या बोलण्यातून दिसून येत असे त्यामुळे मी अनेक प्रयोग केले. असे अनेक विकास कामांसोबत प्रत्येकाच्या अडीअडचणीसाठी मी सदैव तत्पर राहिलो असून या व्यतिरिक्त जो तुमचे काम करत असेल तर आपण लोकशाहीमध्ये आपल्याला अधिकार आहे तो अधिकार आपण त्या पद्धतीने बजावावा अशी भावनिक साद महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांनी मतदारांना केली.



याप्रसंगी अंमळनेर व डोंगरकिन्ही सर्कल मधील पांढरवाडी फाटा (गांधनवाडी, पांढरवाडी, संकुडवाडी),खडकवाडी,कोतन (बेदरवाडी),काकडहिरा,अंमळनेर(उंडेवाडी, साबळेवाडी व पन्हाळकरवाडी, डागाचीवाडी, मिसाळवाडी, दौलतवाडी),निरगुडी (बेदरवाडी)पिंपळवंडी (अंबेवाडी, चंद्रेवाडी, जरेवाडी, थोपटवाडी, सरदवाडी, नाकाडवाडी, हांडेवाडी)उखंडा,जाधववाडी (घोळेवाडी, गायकवाडी, भराटवाडी)पिट्ठी,पांगरी (पांगरी खालील पूर्ण वाड्या व वस्त्या),नायगाव,डोंगरकिन्ही (डोंगरकिन्ही गाव अंतर्गत वाड्या व वस्त्या),रोहतवाडी (भक्ताचे गोठे),कारेगाव (जन्नेवाडी, कंठाळवाडी),डोमरी (अंतर्गत सर्व वाड्यांसह वस्त्या),नाळवंडी (भाटेवाडी, वाड्या व वस्त्या),वड्झरी (सर्व वाड्यांसह वस्त्या),धसपिंपळगाव (तगारा, महेंद्रवाडी, सगळेवाडी) या गावांतील ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचारात सुरेध धस यांनीच मारली मुसंडी.. अडचणीत धावुन येणाऱ्या नेत्याचे गावागावात जंगी स्वागत

जाती धर्माच्या पलीकडे जाऊन कायम लोकांच्या मतदीला धावून जाणारे, त्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे एकमेक नेते सुरेश धस हे आहेत. आष्टी मतदार संघात त्यांच्या प्रचारात रथ विजयी वेगाने धावत असून दोनच दिवसात सुरेश धस यांनी प्रचारात मुसंडी मारली आहे... ते ज्या गावात जातील तेथील लोक धस कुटूंब कायम आमच्या मदतीला धावून येतात... इतर नेते केवळ निवडणुकीच्या तोंडावर येतात, अशा बोलक्या प्रतिक्रिया देत सुरेश धस यांचे गावा-गावात जंगी स्वागत करत आहेत... सर्वत्र होत असलेल्या या स्वागताने सर्व जाती-धर्मातील लोक सुरेश धस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट होत आहे.

# अखेर दिड वर्षापासुन धुळखात पडुन असलेली २०० खाटांची माता व बालसंगोपन ईमारत कार्यान्वित होणार

## जिल्हा शल्य चिकित्सकांच्या सुचना ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश:- डॉ.गणेश ढवळे

बीड: सन २०१६-१७ साली जिल्हा रुग्णालयाच्या आवारात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रुग्णालय उभारण्यासाठी २१ कोटी रुपये निधीची मंजुरी मिळुन तरतूद करण्यात आली होती.मात्र कंत्राटदारांच्या ढिसाळ कारभारामुळे काम वेळेत पूर्ण झाले नाही. त्यानंतर गेल्या दिड वर्षापासुन इमारतीचे काम पूर्ण होऊनही आक्सिजन पाइपलाइन लिफ्ट, विद्युतीकरण, अग्निरोधक यंत्रणा आदी काम अपूर्ण राहिल्याने ईमारत २०० खाटांची ईमारत धुळ्यात पडुन होती. याचवेळी जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या अपु-या कोंदट व ईमारतीत उपचारांमुळे महिलांची हेळसांड होत होती. त्यामुळे तातडीने काम पूर्ण करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली सहका-यांनी वर्षभरापासून निवेदन तसेच आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा केला.तत्कालिन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ -मुंडे यांनी आंदोलनाची दखल घेत जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष ईमारतीची पाहणी करत जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून ३ कोटी रूपयांची तरतूद केली होती. वर्षभरापासून तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे, डॉ.अशोक बडे आणि विद्यमान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर दि.०६ बुधवार रोजी डॉ.अशोक थोरात यांनी पाहणी करून रुग्णालय सुरू करण्याबाबतच्या तांत्रिक बाबींच्या सुचना आधिका-यांना दिल्या असुन दहा दिवसांत कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे सांगितले. अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असुन महिलांची हेळसांड थांबणार आहे.

१५ आगस्ट पासुन महाराष्ट्र शासनाने आरोग्य सेवा मोफत करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून बीड जिल्हा रुग्णालयातील आंतररूग्ण आणि बाह्यरुग्ण संख्येत कमालीची वाढ झाली असुन बीड जिल्हा रुग्णालयाची आंतररुग्ण क्षमता ३२० आहे तर दररोज ४०० -५००च्या आसपास रूग्ण उपचारासाठी येतात.वाढत्या रुग्ण संख्येमुळे जिल्हा रुग्णालयाच्या अपु-या , कोंदट वातावरण असलेल्या जुन्या ईमारतीत गर्दी होत असुन जिल्हा रुग्णालयातील स्त्रीरोग विभागात खाटा अपु-या पडत असुन यामुळे नवजात बालके व नवमातांची तारांबळ उडत असल्याचे शेजारील २०० खाटांची सोय असलेल्या दिड वर्षापासुन धुळखात पडुन असलेल्या माता व बाल रुग्णालयाची ईमारत कार्यान्वित केल्यास रूग्णांची अडचण दुर होऊ शकते यासाठी डॉ.गणेश ढवळे व सहका-यांनी पाठपुरावा वर्षभरापासून केला होता.अखेर लवकरच ईमारत कार्यान्वित होणार आहे.आणि महिलांची हेळसांड थांबणार आहे.




राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालयात महिला व बालरुग्णांसाठी २१ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली २०० खाटांची ईमारत निधी अभावी धुळखात पडुन असुन जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून तातडीने निधी देण्यात यावा यासाठी दि.५ फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हा कार्यालयासमोर धरणे आंदोलन केल्यानंतर त्याच दिवशी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ - मुंडे यांनी जिल्हा रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देत ईमारतीची पाहणी करून आक्सिजन पाइपलाइन, विद्युतीकरण,अग्निरोधक यंत्रणा यासाठी ३ कोटी रूपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजना निधीतून मंजूर केला होता.ईमारतीची पाहणी करताना तत्कालीन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागेश चव्हाण, डॉ.हनुमंत पारखे उपस्थित होते.माता व बाल रूग्णालयाची ईमारत कार्यान्वित करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केल्यानंतर काल दि.६ बुधवार रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी नव्या ईमारतीची पाहणी करून रूग्णालय सुरू करण्याबाबतच्या तांत्रिक सुचना आधिका-यांना दिल्या असुन यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संतोष शहाणे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एल.आर तांदळे,नोडल अधिकारी डॉ.हनुमंत पारखे उपस्थित होते.सध्या प्रसुती,सिझेरीयनमध्ये जिल्हा रुग्णालय अव्वल नंबर असुन नव्या इमारतीमध्ये महिला व बालकांसाठी स्वतंत्र रूग्णालय सुरू झाल्यानंतर आणखी रूग्ण सेवा आधिक प्रभावी होणार असुन सर्व तयारी अंतिम टप्प्यात असुन साधारणतः १० दिवसात ईमारत कार्यान्वित होणार असल्याचे डॉ.अशोक थोरात यांनी सांगितले.

# वंचित बहुजन आघाडी जनसंपर्क कार्यालयाचे मोठ्या उत्साहामध्ये उद्घाटन

चकलांबा ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा निवडणुकीतील वंचित बहुजन आघाडी अधिकृत उमेदवार प्रियांकाताई खेडकर यांनी बुधवार दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता शिरस मार्ग फाटा येथे जनसंपर्क कार्यालय चे उदघाटन ह भ प सुरेशानंद महाराज श्रृगऋषीगड शिंगारवाडी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रियांकाताई खेडकर बोलताना म्हणाल्या शेती पाणी रस्ते रोजगार व वीज या प्रश्नाला प्राधान्य दिले जाणार येणाऱ्या पाच वर्षात या सर्व गोष्टींना प्राधान्य देत मतदार संघ सुजलाम सुफलाम करणार असून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवत ही निवडणूक विकास कामांच्या जोरावर लढवणार असल्याचे प्रियांका ताई खेडकर यांनी सांगितले.यावेळी गेवराई तालुक्यातील विधानसभा उमेदवार प्रियांकाताई खेडकर, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष



अजयकुमार गायकवाड पदाधिकारी श्री राजेंद्र पोकळे, भारत हवाले, राजेंद्र हराळे,बलभीम बारगजे, बाळू हराळे, बाबुराव कोळेकर, सुंदर मार्कड, सोमेश्वर कोळेकर, बबन पांढरे, करण काळे, नंदकुमार उघडे, भाऊसाहेब सातगणे, ज्ञानेश्वर माने, ओबीसी दलित मुस्लिम वंचित बहुजन आघाडी चे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. येणाऱ्या २० तारखेला गॅस सिलेंडर या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड मताने विजयी करा

# आष्टी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांना विजयी करा

## संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वरजी सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज आष्टी येथे आष्टी विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मेहबूब भाई शेख यांच्या प्रचारार्थ आष्टी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

बैठकीस शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी संबोधीत केले व आष्टी विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मेहबूब भाई शेख यांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी कामाला लागावे असे सांगितले..



यावेळी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, पाटोदा तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे,आष्टी विधानसभा प्रमुख नवनाथ आटोळे,राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. नदीम शेख,सहकार सेनेचे ठकसेनजी तुपे,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी सचिन अरुण,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे,आष्टी शहर प्रमुख महेश एकशिंगे,आष्टी तालुका युवा अधिकारी शिवप्रसाद जाधव, आष्टी युवा शहर अधिकारी रंगनाथ आजबे,तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे,उप तालुका प्रमुख संदीप हाडे,उप तालुका प्रमुख अक्षय साप्ते, उप तालुका प्रमुख अक्षय साप्ते, गटप्रमुख रामदास मोहिते,गणप्रमुख देविसिंग बिसेन अजय गायकवाड, लाला भाई पठाण सह शिवसेना, युवासेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते...!!

# मी आमदार झालो तर सर्व पोरांची लग्न करून देणार- राजसाहेब देशमुख

## परळी मतदारसंघातील माविआ चे उमेदवार राज साहेब देशमुख यांच अजब आश्वासन

परळी ।प्रतिनिधी

परळी विधानसभा २३३ मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राज साहेब देशमुख यांच अजब वक्तव्य जर मी आमदार झालो तर सर्व पोरांचे लग्न करून देऊ. असे अजब आश्वासन शरद पवार गटाचे उमेदवार राज साहेब देशमुख यांनी दिले आहे त्यांच्या या आश्वासनाची सर्वत्र चर्चा रंगली आहे सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा जोरदार प्रचार सुरू आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवाराकडून विविध आश्वासन दिले जात आहेत त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातील एक उमेदवाराने दिलेल्या आश्वासनाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. जर मी आमदार झालो तर सर्व पोरांचे लग्न करून देऊ असे आश्वासन शरद पवार गटाचे उमेदवार राज साहेब देशमुख यांनी दिली आहे. त्यांच्या या आश्वासनाची सर्वत्र चर्चा रंगली आहे. महाराष्ट्रातील हाय व्होल्टेज मतदारापैकी मतदारसंघापैकी एक मतदार संघ म्हणून परळी विधानसभा मतदारसंघाला ओळखले जाते परळी विधानसभेचे व बीड जिल्ह्यातील. राज साहेब देशमुख नेमकं का म्हणाले?

परळीतील तरुण पोरांना लग्नासाठी विचारताना लोक विचारतात पोराला नोकरी आहे का? सरकारचं देतच नाही तर कशी लागणार काही उद्योगधंदे आहे का यामुळे सर्व पोरांचे लग्न होणे अवघड झाले आहे त्यामुळे सर्व पोरांना मी आश्वासन देतो जर मी परळीचा आमदार झालो तर सगळ्या पोरांची लग्न लावून देऊ असे आश्वासन दिले आहे. सगळ्या पोरांना कामधंदा देऊ असे अजब आश्वासन राजसाहेब देशमुख यांनी दिले. सध्याची परिस्थिती इतकी वाईट आहे की मुलींची संख्या टक्केवारीनुसार ६० टक्के घसरलेला आहे. तर महाविकास आघाडीचे उमेदवार राज साहेब देशमुख यांनी माविआ चे राजसाहेब देशमुख याचे वक्तव्य करून मुलांना व तुमचे लग्न करून देतो असे आश्वासन देऊन



अख्खा मतदारसंघच ह्या वक्तव्यावर तरुण सर्व सैरावैरा झालेला आहे तरी निवडून येण्यासाठी भावी आमदार कोणत्या शब्दाचा वापर करतील हे सांगता येत नाही.

# वंचित बहुजन आघाडी बीड विधानसभेच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन थाटात संपन्न

वंचितच्या कार्यकर्त्यांनी केलाय निर्धार बीडचा आमदार पुरुषोत्तमच निवडून आणणार.

बीड ।प्रतिनिधी

महात्मा ज्योतिबा,फुले राजश्री शाहू महाराज,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समतावादी विचार वंचित बहुजन आघाडी सातत्याने जोपासत आलेली आहे.या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये वंचित चा जाहीरनामा जो.शा.बा. समतापत्र वंचीत बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे हस्ते प्रकाशित करण्यात आला.हा जाहीरनामा सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक,राजकीय तसेच सांस्कृतिक सर्वांगीण विकासाचा अजेंडा असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे बीड विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार पुरुषोत्तम वीर यांनी केली.नाळवंडी नाका येथे आज दुपारी तीन वाजता वंचित बहुजन आघाडीच्या संपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते तय्यब एजाज सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे महिला आघाडीचा जिल्हाध्यक्ष ॲड.अनिता चक्रे,युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष मेजर अनुरथ वीर, माथाडी कामगार युनियन जनरल चे जिल्हाध्यक्ष आकाश भैय्या जावळे,जिल्हा संघटक डॉ.गणेश खेमाडे यांचे सह तालुका शहर कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रा.कॉँ.चा जाहीरनामा प्रकाशन सोहळा संपन्न

प्रतिनिधी । बीड

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड शहरात पहिलीच जाहीर सभा आहे. मागील एक वर्षापासून बीड मतदारसंघाचा आढावा घेतोय. शहरातील प्रभाग १, ९, १० या भागात सुरू असलेले कामे टक्केवारीसाठी आमदारांनी बंद पाडले. जनतेला वेठीस धरण्याचे काम केले. आपल्या पदाचा वापर लोकांच्या हितासाठी करावा, असं त्यांना कधीही सुचले नाही, असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला.बीड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ मतदारसंघात सभांचा धडाका सुरू आहे. मंगळवारी (दि.५) सायंकाळी बीड शहरात सभा पार पडली. यावेळी ते संबोधित करत होते.







## उच्चशिक्षित नेतृत्व डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून द्या : डॉ.लक्ष्मण जाधव

केंद्र सरकारने सर्व सामान्य घटकांसाठी अनेक उपाययोजना आणल्या आहेत. राज्य सरकारने आणल्या आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघासाठी विविध शासकीय योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केला. डॉ.योगेश क्षीरसागर हे वंचित पीडित उपेक्षित लोकांसाठी काम करत आहेत. सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारे उच्चशिक्षित युवा नेतृत्व डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून द्यायचं आहे. आपण जी चूक लोकसभेत केली ती चूक विधानसभेत न करता डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणायचे आहे, असे आवाहन भाजपचे डॉ.लक्ष्मण जाधव यांनी केले आहे.

व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, डॉ.लक्ष्मण जाधव, अनिल चांदणे, विलास बामणे, माजी नगराध्यक्ष बाबूराव दुधाळ, प्रा.किशोर काळे, सुभाष सपकाळ, रमेश चव्हाण, गणेश वाघमारे, रवींद्र कदम, रंजीत बनसोडे, बाळासाहेब आंबेकर, संध्या राजपूत, शालिनीताई परदेशी, शाकेरा शेख, धनंजय काळे, अशोल काळे, ड.महेश गर्जे, मोहन आघाव, राहुल आघाव, विनोद हातागळे आदींची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, शहरातील भागातून कॅनॉल रोड भागात रस्ते केले. विकासाची अनेक कामे यापूर्वी केलेली आहेत. या भागातून अनेक टिप्पर हे अवैधरित्या चालतात, हे सर्व कोणाचे आहेत. हे सर्वांना चांगलेच माहीत आहे. मात्र २० तारखेनंतर एकही टिप्पर, अवैध गाडी या रस्त्यावर दिसणार नसल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ठणकावून सांगितले. येत्या २ वर्षात बीड मतदारसंघातील उर्वरित सर्व कामे पूर्ण करू असे आश्वासन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी यावेळी दिले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

ग्रामीण भागातून शेकडो तरुणांचे प्रवेश

नाळवंडी गटातील पिंपळगाव मांजरा येथील शिवाजी राऊत, गणेश भिसे, सोमनाथ राऊत, रामेश्वर राऊत, रामनाथ राऊत, सिद्धेश्वर राऊत, अनिल राऊत, मैंदा येथील युवा कार्यकर्ते सुभाष मोमीन, विलास पवार, विश्वनाथ राठोड, दहिफळचे युवा कार्यकर्ते पंडित जाधव, अशोक जाधव, निर्मळवाडीचे वचिष्ट वाणी, नारायण वाणी, काळेगाव हवेली (तांडा) येथील कल्याण पवार, बंडू राठोड, भगवान पवार, हरिभाऊ पवार, शिवणीचे शैलेंद्र शिंदे, बळीराम शिंदे, रवी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली राजेश डोळस, विकास डोळस, रोहन डोळस, सोमनाथ गायकवाड, उत्तम धुमाळ, सोमनाथ घोडके, गोकुळ शिंदे या प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. ब्रह्मगाव येथील दिलीप ठाकूर, सुनील ठाकूर, लखन ठाकूर, धोंडीसिंग ठाकूर, अर्जुन ठाकूर, दिनेश ठाकूर, अभिजीत ठाकूर, विवेक गंगावणे, महादेव जाधव, राजाराम बनसोडे, दत्ता बिडवे, कुटेवाडीचे नवनाथ कांबळे, पांडुरंग वाली, बालासाहेब कुटे यांच्यासह शेकडो ज्येष्ठ, तरुण युवकांनी आदींनी प्रवेश केला. तसेच, शिरापूर गात येथील नवनाथ खरात, बाळू गाडे, नारायण कुंडरे, विठ्ठल कुंडरे, प्रल्हाद कुंडरे, हरिभाऊ कुंडरे, मधू खरात, विष्णू ढोरमारे, माऊली खंडागळे, पप्पू ढोरमारे, बाप्पासाहेब उबाळे, विठ्ठल गाडे, राम गाडे, अजय तावरे, राजू चव्हाण आदींनी प्रवेश केला.

## क्षीरसागर कुटुंबाने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही : इकबाल शेख

क्षीरसागर कुटुंबाने कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. मागील पाच वर्षात आमदाराने शहर, ग्रामीण भागात कसलाच विकास केला नाही. आता डॉ.योगेश क्षीरसागर यांना संधी देऊन आमदार करायचे आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने वॉर्डमध्ये जाऊन सर्व सामान्य नागरिकांपर्यंत जाऊन त्यांच्याकडून मतदान करून घ्यायचे आणि विकासकामे करणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागर यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांनी केले.

# अब्दुल सत्तारांच्या शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार!

प्रतिनिधी । बीड

सत्तारांच्या ४२ शाळांबरोबरच जिल्ह्यातील ९० शाळांनाही याच कारणावरून नोटीस देण्यात आली.

निवडणूक आयोगाला गंडवणे गद्दार टोळीचे अब्दुल सत्तार यांना चांगलेच महागात पडले आहे. निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांची यादी न देणाऱ्या सत्तारांच्या शाळांमधील मुख्याध्यापकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी विकास मीना आणि निवडणूक उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अब्दुल सत्तार यांच्या नॅशनल एज्युकेशन सोसायटी आणि प्रगती एज्युकेशन सोसायटीमार्फत ४२ शाळा



चालवण्यात येतात. या शाळांनी निवडणूक कामासाठी आपल्या कर्मचाऱ्यांची यादी निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर टाकली नव्हती. हे प्रकरण चव्हाट्यावर येताच एकच खळबळ उडाली. सत्तारांच्या ४२ शाळांबरोबरच जिल्ह्यातील ९० शाळांनाही याच कारणावरून नोटीस देण्यात आली. नोटीस बजावून निवडणूक विभागाने हात वर केले. मात्र ओरड झाल्यानंतर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना या संदर्भात पत्र देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांची यादी देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची असते. त्यामुळे यादी न देणाऱ्या शाळांच्या मुख्याध्यापकांवर निवडणूक कामात अडथळा आणल्याच्या कारणावरून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

## कार्यकारी अभियंता, प्राचार्यांवरही कारवाई


आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकर आणि रत्नपूर येथील एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले. कार्यकारी अभियंता अशोक येरेकर एका धार्मिक कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांचे एका राजकीय नेत्यासोबत छायाचित्र असल्याचीही तक्रार आली होती. रत्नपूर येथील एका महाविद्यालयाचे प्राचार्य उमेदवारासोबत अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित राहिल्याची तक्रार मिळाली होती. त्यावरून ही कारवाई करण्यात येणार असल्याचे मीना म्हणाले.

# वर्ध्यातील स्टील कंपनीत भीषण स्फोट, १७ कामगार जखमी

## गंभीर जखमींना नागपूरला हलवले

प्रतिनिधी । वर्धा

विदर्भाच्या वर्धा जिल्ह्यातील भूगाव येथील एवोनिथ स्टील कंपनीत भीषण स्फोट झाल्याची घटना घडली असून भूगाव इथल्या कंपनीत फर्निशच्या बाजूला हा स्फोट होऊन मोठी आग लागली आहे. कंपनीत कुलिंग प्रोसेसचे काम सुरू असताना स्फोट झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या स्फोटात १७ कामगार जखमी असून यातील काही कामगार गंभीर असल्याची माहिती आहे. स्फोटाच्या (इश्ररीं) घटनेनंतर स्थानिकांच्या मदतीने जखमी व गंभीर जखमींना शहरातील सावंगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या दुर्घटनेतील गंभीर जखमींना नागपूरला



हलविण्यात येत असल्याची माहिती आहे. दरम्यान, स्फोटाच्या घटनेनंतर अग्निशमन दलास पाचारण करण्यात आलं असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होते.

कंपनीत लागलेल्या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. मात्र, कंपनील काही द्रव्यांचा स्फोट झाल्याने आग मोठ्या प्रमाणात पसरल्याचं पाहायला मिळालं. स्थानिकांनी व अग्निशमन दलाच्या बंबाने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. मात्र, आगीने रौद्र रुप धारण केल्याचं दिसून आलं. या दुर्घटनेत कंपनीचे मोठे नुकसान झाल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, आगीचे लोट दूरपर्यंत पसरल्याने कंपनीतील अनेक वस्तू जळून खाक झाल्या आहेत.

# ‘तुम्ही पुढच्या ३६ तासात....’, सुप्रीम कोर्टाचा अजित पवारांना आदेश

पक्ष चिन्हाबाबत मोठा निर्णय

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष चिन्हाबाबत सुप्रीम कोर्टात आज सुनावणी पार पडली. यावेळी सुप्रीम कोर्टाने अजित पवार गटाला ३६ तासात वृत्तपत्रात जाहिरात देण्याचा आदेश दिला. वर्तमानपत्रात मराठी भाषेत घड्याळ चिन्हाबाबत निर्णय न्यायप्रविष्ट असल्याविषयीचा मजकूर ३६ तासात प्रसिद्ध करा असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे. तसंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याता आदेशही दिला आहे.

सुप्रीम कोर्टात सुनावणीदरम्यान डिस्क्लेमरबाबत विचारणा करण्यात आली. आमच्याकडून जाहिरातीच्या प्रत्येक ठिकाणी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असा डिस्क्लेमर दिला जात आहे असं अजित पवारांच्या वकिलांनी सांगितलं. तुम्ही प्रत्येक दिवशी येणाऱ्या जाहिरातीमध्ये हा डिस्क्लेमर देत आहात का? अशी विचारणा कोर्टाने केली. दररोजच्या नाही मात्र कॉमन ठिकाणी डिस्क्लेमर दिला आहे असं यावेळी सांगण्यात आलं.

दरम्यान शरद पवार यांचे वकील प्रांजल अगरवाल यांनी अनेक ठिकाणी डिस्क्लेमर दिला नसल्याचा दावा केला. अजित पवारांच्या वकिलांकडून आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करतो आहे असा दावा करण्यात आला असता, शरद पवारांकडून पुरावे मिटवण्याचे काम सुरु असल्याचा आरोप करण्यात आला.



अजित पवारांच्या स्वतःच्या मतदार संघात घड्याळ चिन्हासोबत मजकूर छापत नाहीत असा आरोप शरद पवार गटाकडून करण्यात आला. अनेक ठिकाणी शरद पवार यांचा जुना फोटो, जुने व्हिडिओ अजित पवार यांच्या पक्षाकडून दाखवले जात आहेत. हा प्रचार पूर्ण चुकीचा आहे. मागच्या सहा महिन्यांपासून डिस्क्लेमरबाबत त्याच्याकडून सूचना पाळली जात नाही असाही आरोप करण्यात आला. यावर सुप्रीम कोर्टाने पुढील ३६ तासात वृत्तपत्रात डिस्क्लेमर छापण्याचा आदेश दिला.

कोर्टात नेमकं काय घडलं?

शरद पवारांचे वकील : १९ मार्चच्या आदेशाचे पालन होत नाही. ते शरद पवारांचे व्हिडिओ चालवत आहेत.

न्यायमूर्ती सूर्यकांत : तुम्ही आता निवडणुकांवर लक्ष केंद्रित करा

वकील: सातत्याने होत असलेल्या उल्लंघनामुळे आम्ही येथे निषेध नोंदवत आहोत. त्यांचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणाले आजच्या सुनावणीत काहीही होणार नसून ते घड्याळ चिन्हाने लढणार आहेत. त्यांच्या जाहिरातींमध्ये कोणताही डिस्क्लेमर नाही

अजित पवार गटाचे वरिष्ठ वकील बलबीर सिंग: गंभीर आरोप

सुप्रीम कोर्ट: मार्चमधील आदेश दोन्ही पक्षांच्या सहमतीने होता

शरद पवारांसाठी वकील - त्यांना नवं चिन्ह मिळालं तर बरं होईल

सुप्रीम कोर्ट अजित पवार गटाला: ३६ तासांच्या आत सर्व वर्तमानपत्रातील जाहिरातींमध्ये डिस्क्लेमर टाका... त्या आदेशाचे पालन करा

शरद पवारांच्या बाजूने अभिषेक मनु सिंघवी: आम्ही म्हणत आहोत की व्यवस्था अपयशी ठरली आहे कारण ते शरद पवार माझे दैवत आहेत असं विधान करत राहतात. ते वारंवार उल्लंघन करत आहेत.

न्यायमूर्ती दीपंकर दत्ता : तुम्ही म्हणताय की निवडणुकीच्या वेळी त्याचा वापर करू नये?

सिंघवी : निवडणूक प्रक्रियेतील अडचण म्हणजे आदेशाचं उल्लंघन होत आहे.

सुप्रीम कोर्ट: आम्ही हे सुनिश्चित करू की पालन होईल आणि प्रत्येकाला (चिन्हाची) माहिती होईल.

सुप्रीम कोर्ट : ३६ तासांच्या आत वृत्तपत्रांमध्ये घड्याळाच्या चिन्हाबद्दल नवीन डिस्क्लेमर प्रकाशित करा. वृत्तपत्रातील महत्त्वाच्या जागी ही जाहिरात छापावी जेणेकरून जास्त प्रसिद्धी मिळेल. व्यापक प्रसिद्धीसह वर्तमानपत्रांच्या प्रमुख भागांमध्ये करणे आवश्यक आहे.

# संदीप क्षीरसागर यांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा अनिल जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश

## निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी– अनिलदादा जगताप

बीड (प्रतिनिधी)

निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सोडचिट्ठी देत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश केला आहे. अनिलदादा जगताप हे तळागाळातील माणसांची जाण लोकप्रिय नेते आहेत. बीड विकासाची धुरा अनिलदादा यांच्या हाती आल्यास ते बीड विकासाचा कायापालट करतील. असा विश्वास व्यक्त करत बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या अविनाश पाटोळे ग्रामपंचायत सदस्य माळस जवळा, सचिन पाटोळे, दत्ता पाटोळे, अभिषेक पाटोळे, अरविंद पाटोळे, करण पाटोळे, केशव पाटोळे, योगेश पाटोळे, आकाश गवळी, आकाश सोनवणे, अशोक लोखंडे, रणजित पाटोळे, नागेश पाटोळे, शहादेव पाटोळे, रमेश पाटोळे, रवींद्र पाटोळे, महादेव पाटोळे, गणेश पाटोळे, दिलीप पाटोळे यांच्यासह शेकडो पाटोळे मित्रपरिवाराने अनिलदादा जगताप यांच्याकडे काल दि. ६ नोव्हेंबर रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान



जाहीर प्रवेश करत त्यांच्या विजयासाठी वज्रमुठ आवळली आहे. अनिलदादा जगताप यांनी सर्व तरुणांचे सहर्ष स्वागत करत त्यांचा स्वतःकडे प्रवेश करून घेतला. दरम्यान अनिलदादा जगताप यांनी माळस जवळा येथील तरुणाईचे साथ विधानसभा निवडणुकीत मोलाची भूमिका बाजावेल असा विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी आहे. तसेच आता खऱ्या अर्थाने भरकटलेली तरुणाई योग्य ठिकाणी आली असल्याची भावना अनिलदादा जगताप यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. याप्रवेश सोहळ्या प्रसंगी अनिलदादा जगताप यांचे कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शक्यतो पाडापाडी कराच, पण मराठा समाजाच्या हिताचा उमेदवारच निवडून द्या-मनोज जरांगेचे आवाहन

प्रतिनिधी । बीड

**अपक्ष अर्ज भरून मते खायचे काम करू नका. त्यामुळे ज्यांना पाडायचे आहे ते पडणार नाहीत. समाजाला सांगितले आहे. माझा पाठिंबा अपक्षाला आणि कुणालाच नाही. या समाजाला मायबाप मानले आहे. समाज अडचणीत येऊ नये म्हणून योग्य पाऊल उचलत आहे. कुणाच्या प्रचाराला आणि सभेला जाऊ नका. माझा निरोप आला तर बघू आणि नाही आला तर तुमच्या हिताचा निवडून येईल तिकडेच मतदान करायचे, पण शक्यतो पाडापाडी कराच, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले.**

मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेतली. याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा झाली. उमेदवारी यादी दिली होती. पण मनोज जरांगे यांनी निवडणुकीतून माघार का घेतली, ते समजले नाही. त्यांच्या निर्णयाचा आदर करतो, असे राजरत्नम आंबेडकर



यांनी स्पष्ट केले होते. यावर बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मी आंबेडकर यांना माघारी बोललेलो नाही. मी एखाद्याला मानतो म्हटले की, मानतोच. माझ्यासोबत ते असले की, चांगले म्हणायचे आणि नसले की वाईट तसे नाही. ते काही म्हटले तरी मी उत्तर देणार नाही. उभे केलेले उमेदवार जर पडले असते तर समाजाला हिणवले गेले असते, टोमणे मिळाले असते, त्यामुळे समाजाची मान खाली जाईल म्हणून माघार घेतली. समाजासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला आहे. या राजकारणासाठीआरक्षण जायला नको म्हणून मी ही भूमिका घेतली, असे मनोज जरांगे यांनी नमूद केले.पुन्हा एकदा आरक्षणाचा लढा सुरू झाला आहे

पुन्हा एकदा आरक्षणाचा लढा सुरू झाला आहे. पुन्हा लढा उभा करायचा आणि आरक्षण मिळवायचे. राजकारणासाठी असतो तर उमेदवार उभे केले असते. माझा समाज माझ्यासाठी मोठा आहे. समाजाचे भविष्य बघायचे आहे. मूर्ख होऊन चालणार नाही. दीडशे जणांना उभे केले असते. त्यांच्यासाठी सहा कोटी समाजाचे वाटोळे करू शकत नाही. तो क्षणिक आनंद आहे. समाजाला आरक्षण देऊन आयुष्यभराचा आनंद द्यायचा आहे. मूर्खासारखे चाळे नाही करू शकत नाही. मागे सरकलो म्हणून काय वाईट झाले. मराठा समाजाचे काम करतो दीडशे जणांचे काम करत नाही. त्यांच्यासाठी करोडो मराठ्यांना अडचणीत आणणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

दरम्यान, आम्ही अद्याप कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा अपक्षाला पाठिंबा दिलेला नाही. राखीव असो किंवा इतर जागा असोत तेथे आमचा पाठिंबा अद्याप तरी जाहीर केलेला नाही. आता एक ते दोन दिवसांत पुढील दिशा स्पष्ट करणार आहे. मला राजकारणाचा नाद असता तर ५० उमेदवार उभे केले असते. माझी ताकद दिली असती. माझा राज्यात दबदबा झाला असता, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले होते.

# गेवराईत प्रस्थापितांच्या विरोधात लाडक्या बहिणी मैदानात

## पवार-पंडितांची गणिते बिघडवणार?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : विधानसभा मतदारसंघात पवार, पंडित या प्रस्थापितांच्या विरोधात आता लाडक्या बहिणीही मैदानात उतरल्या आहेत. वेगवेगळ्या पक्षाच्या माध्यमातून निवडणूक रिंगणात उतरत या महिला उमेदवार पवार, पंडितांच्या मतांची गणिते बिघडवणार असल्याचे दिसत आहे. यात मराठा कार्ड म्हणूनही तिसऱ्या आघाडीकडून पूजा मोरे या मैदानात आहेत. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार होऊ पाहत आहे.

गेवराई मतदारसंघात १९६२ पासून आतापर्यंत पंडित आणि पवार कुटुंबातीलच आमदार झालेले आहेत. यात त्यांना मंत्रिपदेही मिळाली. परंतु गेवराई मतदारसंघात अद्यापही मोठा असा कोणताच प्रकल्प आलेला नाही. वर्षानुवर्षे तेच ते उमेदवार उभे राहतात आणि पवार व पंडित कुटुंबातीलच आमदार होतो. परंतु यावेळी या प्रस्थापितांच्या विरोधात महिलांनीही बाण ताणला आहे. महाराष्ट्र स्वराज्य पार्टीच्यावतीने पूजा मोरे, मनसेकडून मयुरी खेडकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून प्रियंका खेडकर मैदानात आहेत. तिघी महिला उमेदवारांनी उमेदवारी जाहीर होण्याआधीच मतदारसंघ पिंजून काढला आहे. आता या विस्थापित महिला उमेदवरांचे प्रस्थापित असलेल्या पंडित व पवारांना आव्हान असणार आहे. आता या लाडक्या बहिणी मतांची बेरीज जुळवून कसे





आव्हान देतात, याकडेही लक्ष लागले आहे.

या विषयांची गेवराईत चर्चा? गेवराई मतदारसंघातील गुन्हेगारी, अवैध वाळू वाहतूक, शासकीय कामांतील भ्रष्टाचार हेच विषय सध्या चर्चेत आणले जात आहेत. पवार, पंडितांच्या विरोधात लाडक्या बहिणींकडून आरोपही केले जात आहेत. मतदार मात्र आता याचा कसा विचार करतात? हे निकालानंतर समजेल.

### मराठा कार्ड म्हणून पुजा मोरेंचे आव्हान!

गेवराई मतदारसंघातील प्रस्थापित असलेले आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित, महायुतीचे विजयसिंह पंडित आणि अपक्ष लक्ष्मण पवार हे मराठा आहेत. आता त्यांच्याविरोधात महाराष्ट्र स्वराज्य पार्टीच्या पूजा मोरे रिंगणात आहेत. मराठा आंदोलन, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सक्रिय असल्याने त्यांच्याकडून पवार, पंडितांच्या मतांची गणिते बिघडवली जाऊ शकतात. तर दुसऱ्या दोन्ही महिला उमेदवार या ओबीसी म्हणून रिंगणात उतरल्या आहेत.

### २१ उमेदवार रिंगणात

गेवराई मतदारसंघात ४९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यातील तिघांचे अर्ज अवैध ठरले. त्यानंतर सोमवारी अखेरच्या दिवशी २५ जणांनी माघार घेतली. त्यामुळे आता २१ उमेदवार हे रिंगणात आहेत. यातील ३ महिला आहेत तर १८ पुरुष आहेत.

# शिरोळेंच्या वतनात, आ. पंकजाताई मैदानात!

## सिध्दार्थ शिरोळे यांच्या प्रचारार्थ पुण्यात आ. पंकजाताई मुंडेंचा महिला मेळावा
## स्त्रियांना सन्मान व सुरक्षा देणाऱ्या महायुतीला पुन्हा सत्तेत आणा

पुणे ।प्रतिनिधी

राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या सरकारने स्त्रियांना सन्मान व सुरक्षा देण्याचे काम केले. लाडकी बहिण सारखी योजना राबवून आत्मविश्वास निर्माण केला त्यामुळे आता पुन्हा एकदा महायुतीला सत्तेत आणण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा. एक संस्कारी चेहरा असलेल्या सिध्दार्थ शिरोळे यांच्या पाठिशी उभे राहून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा असं आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी येथे केले.

शिवाजीनगर (पुणे) विधानसभा मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार सिध्दार्थ शिरोळे यांच्या प्रचारार्थ बुधवारी आ. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला मेळावा आयोजित



करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी सुजाता शिरोळे, वर्षा डहाळे, हर्षदा फरांदे, श्रध्दा शिंदे, लावण्या शिंदे, भावना शेळके, सुवर्णा त्रिगुणाईत आदींसह महायुतीच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, महायुती सरकारने राज्यात महिलांसाठी अनेक योजना अंमलात आणण्याबरोबरच महिलांचा सन्मान व सुरक्षा याला प्राधान्य दिले. महाराष्ट्राचे नुकसान होवू द्यायचे नसेल तर एकेक आमदार निवडून येणे आवश्यक आहे. राजकारणात स्त्रियांना सन्मान देणारे, संस्कृती जपणारे व्यक्ती येणे गरजेचे आहे, त्यासाठी संस्कारी आणि विकासाला प्राधान्य देणारा चेहरा म्हणून सिध्दार्थ शिरोळे यांच्या पाठिशी उभे राहून त्यांना विक्रमी मतांनी विजयी करा असं आवाहन यावेळी आ. पंकजाताईंनी केलं.

मंत्री असताना महिलांसाठी अनेक योजना राबविल्या

मंत्री असताना महिलांच्या उत्थानासाठी अनेक योजना राबविल्या. बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज देऊन प्रोत्साहन दिले. बेटी बचाओ बेटी पढाओ, शौचालय बांधकाम, नीर (जल) आणि नारीसाठी काम केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आता तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत, त्यांनी देशाचा विकास केला तसाच राज्यातही विकासाचे जाळे निर्माण केले आहे. महाराष्ट्राचं नुकसान होवू द्यायचं नसेल तर त्यांच्या नेतृत्वात पुन्हा महायुती सत्तेवर येणं आवश्यक आहे, त्यासाठी महायुतीचे उमेदवार निवडून आणा असं आवाहन यावेळी आ. पंकजाताईंनी केलं.

# देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे वाटोळे केले –मेहबूब शेख

आष्टी ।प्रतिनिधी

आज पर्यंत भाजप सरकारने गोरगरीब शेतकऱ्यांची वाटोळ केली महाराष्ट्रातील कांद्यावर जीएसटी तर बाहेरील कांदा निर्यात करताना काहीच नाही प्रत्येकाला दाखवून नेते जवळ केले असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे उमेदवार महबूब भाऊ शेख यांनी घाटा पिंपरी येथे बोलताना व्यक्त केले गुजरात वाले तीन माकड सत्तेत बसले त्यामुळे जनतेची वाटोळे झालेच आहे आरोप त्यांनी केला आजही गोरगरीब शेतकऱ्यांच्या मालाला बाजार भाव मिळत नाही त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत तरी या सरकारला कसलाच घाम फुटला नाही देशात ९६ उद्योगपती यांना ३५ लाख कोटी कर्ज माफ केले पण शेतकऱ्यांच्या हातावर मात्र या सरकारने तुरी दिली असल्याचे ते म्हणाले हे खोक्याचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांचे मात्र वाटोळ झालं या सरकारने लाडकी बहीण योजना काढली आणि



बाजारपेठेत मात्र किराणा शेतीमालाचे भाव वाढवले तुम्ही सगळ्या गुजरातला इथल्या कंपन्या मग मत मागायला तुम्ही गुजरातला जा युवकांच्या हातातील भाकरी तुम्ही हिसकावून घेऊ लागले आहेत अनेक बेरोजगार तरुण या ठिकाणी आहेत मी जर आमदार झालो तर आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात एमआयडीसी नक्कीच एवढ्या वेळेस फक्त मला पाच वर्षात तुमची सेवा करण्याची संधी द्यावी आणि त्या संधीचं सोनं किस करीन असे ते म्हणाले यावेळी घाटा पिंपरी परिसरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते फटाके वाजत त्यांचं गावात जल्लोषात स्वागत करण्यात आलं ये मतदार संघात प्रत्येक आमदार पाच वर्ष राहिला त्यांनी काय केलं फक्त आम्ही तुमचेच आहोत असं म्हणत त्यांनी समाजाचा फायदा घेतला त्यामुळे यावेळेस तुम्ही आम्हाला साथ द्या

# संदीप क्षीरसागर यांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश

## निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी– अनिलदादा जगताप

बीड ।प्रतिनिधी

निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सोडचिट्टी देत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश केला आहे. अनिलदादा जगताप हे तळागाळातील माणसांची जाण लोकप्रिय नेते आहेत. बीड विकासाची धुरा अनिलदादा यांच्या हाती आल्यास ते बीड विकासाचा कायापालट करतील. असा विश्वास व्यक्त करत बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या अविनाश पाटोळे ग्रामपंचायत सदस्य माळस जवळा, सचिन पाटोळे, दत्ता पाटोळे, अभिषेक पाटोळे, अरविंद पाटोळे, करण पाटोळे, केशव पाटोळे, योगेश पाटोळे, आकाश गवळी, आकाश सोनवणे, अशोक लोखंडे, रणजित पाटोळे, नागेश पाटोळे, शहादेव पाटोळे, रमेश पाटोळे, रवींद्र पाटोळे, महादेव पाटोळे, गणेश पाटोळे, दिलीप पाटोळे यांच्यासह शेकडो पाटोळे मित्रपरिवाराने अनिलदादा



जगताप यांच्याकडे काल दि. ६ नोव्हेंबर रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान जाहीर प्रवेश करत त्यांच्या विजयासाठी वज्रमुठ आवळली आहे. अनिलदादा जगताप यांनी सर्व तरुणांचे सहर्ष स्वागत करत त्यांचा स्वतःकडे प्रवेश करून घेतला. दरम्यान अनिलदादा जगताप यांनी माळस जवळा येथील तरुणाईचे साथ विधानसभा निवडणुकीत मोलाची भूमिका बाजावेल असा विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी आहे. तसेच आता खऱ्या अर्थाने भरकटलेली तरुणाई योग्य ठिकाणी आली असल्याची भावना अनिलदादा जगताप यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. याप्रवेश सोहळ्या प्रसंगी अनिलदादा जगताप यांचे कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करु नयेत-सपोनि. गोरखनाथ दहिफळे

सिरसाळा ।प्रतिनिधी

आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात सुजाण नागरिकांनी सोक्षलमीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करून नेय असे आव्हान सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक. गोरखनाथ दहिफळे साहेब. पानी केले आहे. सिरसाळा सर्व नागरिका या विषय महत्वाच्या सुचना सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक. गोरखनाथ दहिफळे याच्या कडुन करण्यात आल्या असून पक्षाचे कोणत्याही उमेदवार यांच्यासह कोणत्याही व्यक्तीचे किंवा कुटुंबाच्याब सामाजिक स्तरावर अवहेलना होईल आशी आक्षेपार्ह टिका टिपणी करू नये आशा पोस्ट शोशलमिडयावर फोटो टाकु नयेत कुठले ही आक्षेपार्ह व व्हिडिओ प्रसारीत करू नये.आशा पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित करणे प्रचलित करू नये आशा पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित करणे प्रचलित कायद्याने गुन्हा आहे. मुळे जनतेला आव्हान केले आहे. जर याचे कोणी पालन केले नाही तर तुमच्यावर कठोर



कारवाई करण्यात येईल असे तसेच सदर पोस्ट वायरल करणे त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला जाईल असे शिरसाळा पोलीस ठाण्याच्या वतीने ठाण्याच्या वतीने सांगण्यात येत आहे अशी दैनिक आरंभ आरं शी बोलताना सांगितले आहे त्यानुसार परिसरातील सर्वांना विनंती करण्यात येते की शिरसाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीत असे गैरप्रकार होऊ नये यासाठी कडी कोट बंदोबस्त केला जाणार आहे अशा प्रकारचे पोस्ट व्हायरल केल्यास त्याच्यावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला जाईल आशी सूचना केले आहेत. याची नागरिकांनी काळजी घ्यावा घेण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

# राडी जिल्हा परिषद गटात धनंजय मुंडेंच्या प्रचाराचा झंझावात

## राडी, मुडेगाव, राडी तांडा, धानोरा (बु.), तडोळा, अकोला येथे कॉर्नर बैठकांना आले सभेचे स्वरूप
## विकासात आणि सुख-दुःखात मी वाटेकरी, मला आशीर्वाद द्या – धनंजय मुंडे
## धनुभाऊ तुम्ही महाराष्ट्रात फिरा, परळी आम्ही सांभाळतो, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिला विश्वास

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**परळी मतदारसंघाच्या अंबाजोगाई तालुक्यातील राडी जिल्हा परिषद गटात विविध गावांमध्ये बुधवारी दिवसभर धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा झंझावात पाहायला मिळाला. धनंजय मुंडे यांनी बुधवारी सकाळच्या सत्रात राडी, दैठणा मुडेगाव, राडी तांडा येथे कॉर्नर बैठका घेतल्या; तर सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक, तडोळा व अकोला या गावांमध्ये कॉर्नर बैठका घेतल्या. या सर्वच गावांमधून धनंजय मुंडेंना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, प्रत्येक कॉर्नर बैठकीला अगदी जाहीर सभेचे स्वरूप आल्याचे पाहायला मिळाले. माझी जात आणि धर्म हा विकास आहे. आम्हाला स्वर्गीय मुंडे साहेब व स्वर्गीय पंडित अण्णा यांनी सर्वसमावेशक विकासाचे राजकारण शिकवले. या मातीतील माणसाच्या विकासासाठी आणि कल्याणासाठी मी माझे आयुष्य समर्पित केले आहे. इथल्या विकासाच्या प्रत्येक विटेमध्ये आणि इथल्या माणसाच्या सुख-दुःखामध्ये मी कायम वाटेकरी आहे. त्यामुळे मांजरापट्ट्यातील या भागातून मला भरभरून मतदान रुपये आशीर्वाद मिळेल असा मला विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यांनी या बैठकांमधून व्यक्त होताना सांगितले.**

धनंजय मुंडे हे राज्याचे नेतृत्व असून, तुम्ही आता संपूर्ण राज्यात पक्षाच्या व महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारात फिरावे. परळी विधानसभा मतदारसंघात तुमचा प्रत्येक कार्यकर्ता हा स्वतःची निवडणूक समजून लढेल. तुम्ही या निवडणुकीची जबाबदारी आमच्यावर सोडा आणि बिनधास्त सबंध महाराष्ट्रात फिरा, असा विश्वास यावेळी गावातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे यांना दिला.

गावागावात आगमन होताच स्थानिक गावकऱ्यांनी मोठ्या जल्लोषात कुठे बँड लावून, कुठे फटाके फोडून तर कुठे महिला भगिनींच्या हस्ते औक्षण करून धनंजय मुंडे यांचे जोरदार स्वागत केले. गावात आगमन होताच धनंजय मुंडे यांनी त्या त्या गावातील महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादनही केले.

सकाळच्या सत्रात मा. आमदार संजय भाऊ दौंड,



राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, गोविंदराव देशमुख, राजाभाऊ औताडे, विलास काका सोनवणे, बी सी गंगणे, रणजीत लोमटे, गणेश कराड, तानाजी देशमुख, नरसिंह कदम, प्रदीप भैय्या पाटील, गणेश राव जाधव, दत्ताभाऊ गंगणे, उस्मान साहेब शेख, बालासाहेब गंगणे, शरद पाटील, अजितदादा गरड, मेघराज सोमवंशी, मनोज गंगणे, सुभाष बनसोडे, दगडू बनसोडे, विलास पाटील, हनुमंत आप्पा कोळगिरे, सुधाकर काळुंखे, रघुनाथ जोगदंड, हनुमंत गायकवाड, सतीश गंगणे, रावसाहेब आडे, राजाभाऊ लोमटे, गणेश देशमुख, विठ्ठल जाधव, सचिन बनसोडे, वजीर पठाण, कादर खान पठाण, महबूब शेख, प्रभाकर गंगणे, अख्तर जहागीरदार, हाजी शेख, संदिपान कांबळे, काशिनाथ वाघमारे, अमर कोळगिरे, सिद्धेश्वर कोळगिरे, त्याचबरोबर मुढेगाव येथे लक्ष्मण बापू जगताप, विलास जगताप, प्रवीण जगताप, बाळू तात्या जगताप, राडी तांडा येथे रावसाहेब आडे यांच्यासह काशिनाथ आडे, काशिनाथ राठोड, तसेच सायंकाळच्या सत्रात धानोरा बुद्रुक येथे आबासाहेब पांडे, मेघराज सोमवंशी, विश्वास पाटील, तुषार फुलाने, प्रशांत चिवडे, सुधाकर काळुंखे, विनोद भारती, बिबीशन चिवडे, श्रीकांत सोमवंशी, नवनाथ हातांगळे, नवनाथ काळुंके, रामराव मुळे, तडोळा येथे वसंतराव कदम, बिभीषण कदम, एकनाथ कातळे, अकोला येथे सुदाम आगळे, श्रीनिवास आगळे, वसंतराव आगळे, भारत आगळे, भारत बरकते, गुणवंत आगळे, राखी अंधारे, सुदाम आगळे, यांसह गावागावातील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT